# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 14 July 2024

## Time: 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १४ जूलै २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- महाराष्ट्राला आर्थिक विकासाचं शक्तीकेंद्र आणि मुंबईला फिन-टेक् राजधानी करणं हे आपलं स्वप्न-पंतप्रधानांचं प्रतिपादन
- विधान परिषद निवडणुकीत पक्षादेश झुगारणाऱ्या आमदारांवर कारवाईचा काँग्रेसचा इशारा
- मराठा आरक्षणासाठीच्या महासंवाद शांतता रॅलीचा छत्रपती संभाजीनगर इथं समारोप
- धनगर समाजाच्या मागण्यांसाठी लातूर इथं सोळा दिवसांपासून सुरू असलेलं उपोषण मागे
  आणि
- झिम्बाब्वे विरूद्धच्या चौथ्या टी ट्वेंटी सामन्यात भारताचा दहा गडी राखून विजय-मालिकेत तीन-एक अशी विजयी आघाडी

****

महाराष्ट्राला जगातलं आर्थिक विकासाचं सर्वात मोठं शक्तीकेंद्र आणि मुंबईला फिन-टेक् अर्थात आर्थिक आणि तंत्रज्ञानाची राजधानी करणं हे आपलं स्वप्न असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मोदी यांच्या हस्ते काल मुंबई इथं झालेल्या कार्यक्रमात २९ हजार ४०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचं भूमिपूजन आणि लोकार्पण झालं, त्यावेळी ते बोलत होते. विकसित भारताच्या निर्मितीत महाराष्ट्राची मोठी भूमिका आहे, महाराष्ट्राकडे उद्योग, कृषी, वित्तीय क्षेत्राची ताकद आहे. त्यामुळेच महाराष्ट्र हे भारताचं आर्थिक केंद्र असल्याचं मोदी यांनी नमूद केलं. ते म्हणाले...

“महाराष्ट्र के पास इंडस्ट्री की पावर है। महाराष्ट्र के पास एग्रीकल्चर की पावर है। महाराष्ट्र के पास फाइनैंस सेक्टर की पावर है। इसी पावर ने मुंबई को देश का फाइनेंशियल हब बनाया है। अब मेरा लक्ष्य है। महाराष्ट्र की इसी पावर से महाराष्ट्र को दुनिया का बड़ा आर्थिक पावरहाउस बनाने का मेरा लक्ष्य है मुंबई को दुनिया की फिनटेक कैपिटल बनाने का।”

पर्यटन क्षेत्रात महाराष्ट्र हे देशात पहिल्या क्रमांकांचं असावं हीच आपली इच्छा असल्याचं ते म्हणाले.

वारकऱ्यांच्या सुविधेसाठी २०० किलोमीटरचा संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग पूर्णत्वाला गेला आहे, तुकाराम पालखी मार्गाचं ११० किलोमीटर पेक्षा जास्त काम पूर्ण झालं आहे, लवकरच हे दोन्ही मार्ग खुले होतील असं सांगत पंतप्रधानांनी वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

राज्यपाल रमेश बैस तसंच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. राज्य सरकारच्या विविध प्रकल्पांचे प्रस्ताव कुठल्याही कपातीशिवाय मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांचे आभार मानले.

****

केंद्रीय विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी काल नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला भेट देवून कामकाजाचा आढावा घेतला. विमानतळ प्रकल्प अधिकाऱ्यांना प्रकल्पाच्या वेगवान पूर्ततेसाठी त्यांनी सूचना केल्या. नागरी विमान राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, यांच्यासह अनेक अधिकारी यावेळी उपस्थित होते.

****

प्राप्तिकर विभागानं २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी ६ लाख ४५ हजार कोटी रुपयांहून अधिक प्रत्यक्ष कर संकलन केलं आहे. चालू महिन्याच्या ११ तारखेपर्यंत ७० हजार ९०२ कोटी रुपयांचा परतावा जारी केला आहे. प्राप्तिकर विभागानं जारी केलेल्या आकडेवारीत ही माहिती दिली आहे.

****

विधान परिषद निवडणुकीत पक्षादेश झुगारून विरोधी उमेदवारांना मतदान करणाऱ्या पक्षातल्या आमदारांवर कारवाईचा इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे. विधान परिषदेच्या गेल्या वेळच्या निवडणुकीपासूनच संबंधितांवर लक्ष होतं, आता त्यांची ओळख पटली असून, त्यांच्याविरोधात कारवाई करून पक्षातून

हकालपट्टी केली जाईल, असा इशारा पटोले यांनी, ट्विटरवर जारी एका चित्रफीतीतून, दिला आहे.

****

मध्यस्थी हा वाद मिटवण्याचा परिणामकारक मार्ग असल्याचं, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय यांनी म्हटलं आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं मध्यस्थी विषयक विभागीय परिषदेत बोलत होते. दीर्घकाळ टिकणारा हा मार्ग एक चळवळ म्हणून वकिलांनी पुढे न्यावा, असं आवाहनही न्यायमूर्ती उपाध्याय यांनी केलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत आतापर्यंत १६ हजार ७७८ महिलांची नोंदणी ऑनलाईन तर ६२ हजार ४८८ महिलांची नोंदणी ऑफलाईन पद्धतीने झाली आहे. जिल्हा महिला आणि बालविकास अधिकारी सुवर्णा जाधव यांनी ही माहिती दिली. जिल्ह्यात ग्रामीण भागात नारी शक्ती दूत या ॲपद्वारे अंगणवाडी सेविका तसंच मदतनीसांकडून ही नोंदणी करून घेतली जात आहे.

लातूर जिल्ह्यात या योजनेसाठी अर्ज भरून घेण्याची कार्यवाही गतीने सुरु आहे. प्राप्त अर्जांच्या पहिल्या यादीचं काल जिल्ह्यातल्या सर्व शहरी आणि ग्रामीण भागात चावडी वाचन करण्यात आलं. अर्जदाराची नावं, त्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यावेळी माहिती देण्यात आली.

नांदेड-वाघाळा महापालिकेच्यावतीने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची माहिती देण्यासाठी २२ मदत केंद्र स्थापन करण्यात आले आहेत. हे अर्ज स्वीकारण्यासाठी प्रभागनिहाय मदत कक्षही स्थापन करण्यात आले आहेत.

अहमदनगर जिल्ह्यात या योजनेत जास्तीत जास्त लाभार्थी महिलांचा समाविष्ट करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने मदत केंद्र उभारण्यात आलं आहे. काल केडगाव परिसरातल्या मदत केंद्राचं जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं.

****

मराठा आरक्षण आंदोलनांतर्गत काढण्यात आलेल्या महासंवाद शांतता रॅलीचा काल छत्रपती संभाजीनगर इथं समारोप झाला. आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी या सांगता सभेच्या भाषणात विधानसभा लढवण्याबाबत २० जुलैला निर्णय घेणार असल्याचं जाहीर केलं.

दरम्यान, हिंगोलीतून सुरू झालेली ही रॅली मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यातून मार्गक्रमण करत, काल छत्रपती संभाजीनगर इथं दाखल झाली. यावेळी खासदार संदिपान भुमरे यांनी जरांगे पाटील यांचं  स्वागत केलं. मराठा बांधव मोठ्या संख्येनं या रॅलीत सहभागी झाले होते.

****

धनगर समाजाचा अनुसुचित जमातीत समावेश करण्याच्या मागणीसाठी लातूर इथं अनिल गोयेकर आणि चंद्रकांत हजारे यांनी गेल्या सोळा दिवसांपासून पुकारलेलं उपोषण काल मागे घेतलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या मागण्यांसंदर्भात शिष्टमंडळासोबत चर्चा करून, आगामी आठ दिवसात उच्चस्तरीय बैठक घेणार असल्याचं सांगितलं. लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी पत्राद्वारे ही माहिती आंदोलकांना दिल्यानंतर, त्यांनी समाजबांधवांशी चर्चा करून, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांच्या उपस्थितीत उपोषण मागे घेत असल्याचं जाहीर केलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं काल एआय-एमआयएम पक्षाचे अध्यक्ष खासदार असदोद्दीन ओवैसी यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा केली. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सैयद इम्तियाज़ जलील यांच्यासह अनेक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

****

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संत ज्ञानेश्वर तसंच संत तुकाराम महाराजांच्या पालख्या सोलापूर जिल्ह्याच्या माळशिरस तालुक्यातून मार्गक्रमण करत आहेत. ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा काल पाणीव पाटी इथं तर संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा काल माळीनगर इथं रिंगण सोहळा साजरा झाला.

****

झिम्बाब्वे विरूद्ध सुरू असलेल्या टी ट्वेंटी मालिकेतल्या चौथा सामन्यात भारतानं दहा गडी राखून विजय मिळवत, मालिकेत तीन–एक अशी विजयी आघाडी घेतली आहे. काल झालेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकत भारताने क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. झिम्बाब्वेने सात बाद एकशे ५२ धावा करत, भारतासमोर १५३ धावांचं आव्हान ठेवलं, यशस्वी जयस्वालच्या ९३ आणि शुभमन गिलच्या ५८ धावांच्या बळावर भारतानं हे आव्हान सोळाव्या षटकांत एकही गडी न गमावता साध्य केलं. यशस्वी जयस्वाल सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. मालिकेतला पाचवा आणि अखेरचा सामना आज होणार आहे.

****

लातूर इथं आज जिल्हा प्रशासनातर्फे 'हरितोत्सव'आयोजित करण्यात आला आहे. आज सकाळी महात्मा गांधी चौक ते गंजगोलाई दरम्यान वृक्ष दिंडी काढली जाईल. तर, गंजगोलाई ते हनुमान मंदिर चौक परिसरात नागरिकांसाठी विविध रोपं, आवश्यक साहित्य एकाच ठिकाणी सवलतीच्या दरात उपलब्ध होणार आहे. झाडांची निवड ते लागवड अशी माहिती यावेळी दिली जाणार आहे.

****

परभणी जिल्ह्यातल्या पर्यावरणाचा योग्य समतोल राखण्यासाठी तसच परभणी जिल्हा सुंदर आणि हरित करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने वृक्षवल्ली वाढवूया गाव हरित बनवूया हे अभियान राबवण्यात येणार आहे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर यांनी ही माहिती दिली. याबाबत एक प्रसिद्धीपत्रक काढण्यात आलं. सर्व वयोगटातील लोकांना या वृक्ष लागवडीसाठी प्रेरित करण्यात येणार असून, गाव तिथे घनवन, स्मृति उद्यान निर्मिती, नदीकाठी बांबू लागवड, आदी उपक्रम घेण्यात येणार आहेत.

****

नांदेड जिल्ह्याच्या किनवट तालुक्यात घोगरवाडी ग्रामपंचायती अंतर्गत येणा–या दुर्गम भागातील शिवशक्तीनगर आदिवासी गावात काल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी भेट देवून गावकऱ्यांशी संवाद साधला. प्रधानमंत्री आदिवासी न्याय महाअभियान–पीएम जनमन योजनेचा आदीम आणि कोलाम समाजातील लाभार्थ्यांना मिळालेल्या लाभाबाबत त्यांनी आढावा घेतला.

****